**वादी तर्फे साक्षदार क्र.०१ यांचा पुढील सरतपास वादी तर्फे विधिज्ञ श्री. पी. पी. कुलकर्णी यांच्या मार्फत शपथेवर सुरु.**

प्रस्तुत प्रकरणात माझे पुराव्याचे शपथपत्र व अधिकचे दोन शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर मी वाचून सही केली. मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास निशाणी क्र. ११३ व ११६ देण्यात आले आहे.

०१. माझया वडीलांच्या नावे झालेल्या खरेदीखताची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. सदर प्रमाणीतप्रत प्रतिवादी क्र. ७ तर्फे विधिज्ञानी मान्य केली आहे. करीता त्यास **नि. क्र. १२९** देण्यात येते. तसेच दि. ३०/०४/१९९७ रोजीचे दोन खरेदीखतांच्या प्रमाणीतप्रती दाखल केल्या आहेत. त्यास **नि. क्र. १३० व १३१** देण्यात येते. यादी नि. क्र. ४ सोबत अनु. क्र. ६, ७ व ८ वर कागदपत्रांच्या प्रमाणीत प्रती दाखल केल्या आहेत. सदर प्रति प्रतिवादी क्र. ७ यांनी मान्य केल्या आहेत करीता त्यास **नि. क्र. १३२ ते १३४** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**प्रतिवादी क्र. ०१ ते ०६, ०८ व ०९ विरुध्द एकतर्फा असल्याने उलटतपास नाही.**

**उलटतपास प्रतिवादी क्र. ७ तर्फे श्री. एम. जी. भाले वकीलसाहेब यांचे मार्फत**

०२. आम्ही तिन बहिणी असुन अम्हाला भाऊ नाही. मी सुमारे ३५ वर्षा पासुन उल्हासनगर जि. ठाणे येथे राहते. वादी क्र. २ ही ५० वर्षा पासुन केळीगव्हान येथे राहत होते. वादी क्र. ०३ ही सुमारे ४० वर्षा पासुन उंचेगाव येथे राहते. उल्हासनगर येथे राहण्यापुर्वी मी औरंगाबाद येथे राहत होती. तीघी बहिणींमध्ये वादी क्र. २ थोरली होती. लग्नानंतर मी माहेरी वडीलांकडे वर्षातुन दोन-तीन वेळा येत होती. तसेच वादी क्र. २ व ३ या देखील माहेरी येत होत्या.

०३. हे म्हणेणे खरे नाही की, माझे वडील जे जे व्यवहार करत होते त्याबद्दल मला माहीत नाही. माझे वडील आजारपणाने खरपुडी येथे मयत झाले. त्यांचे कोणत्याही दवाखाण्यात उपचार सुरु नव्हते. माझे वडील मयत झाले तेव्हा मी खरपुडी येथे ५ महिने होते. हे म्हणेणे खरे नाही की, सदर कालावधीत गयाबाई गुलाब काळे हे वाद मिळकत मालक म्हणुन वहिती करत होते. माझे वडील हयात असतांना त्यांनी गयाबाई काळे यांच्या विरुध्द दावा दाखल केला नव्हता. साक्षीदार सांगते की, सदर काळात कागदपत्रे जमा करने सुरु केले होते. आम्ही वडीलांना असे सुचविले होते की, गयाबाई काळे यांच्या विरुध्द दावा दाखल करा किंवा आम्हाला दावा दाखल करण्यासाठी अधिकारपत्र दया. आम्ही कागदपत्रे काढले त्यावेळी गयाबाईच्या नावे खरेदीखत झाल्याचे आम्हाला कळले. आम्ही गयाबाई

विरुध्द फौजदारी खटला दाखल केला नाही.



०४. वाद मिळकतीच्या पुर्वेस शिंद यांची मिळकत आहे व पचिश्मेस निकाळजे यांची मिळकत, दक्षिणेकडुन रंगनाथ बारड यांची मिळकत आणि उत्तरेकडुन गायरान आहे. वाद मिळकतीची तिसरा व्यक्ती करीत आहे. हे म्हणेणे खरे नाही की, वाद मिळकतीची वहिती प्रतिवादी क्र. ७ मजुराकरवी करत आहे.

०५. वाद मिळकतीतुन बेदखल केल्यापासुन ते मरे पर्यंत माझ्या वडीलांनी दावा दाखल केला नाही. हे म्हणेणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी वाद मिळकत गयाबाई काळे यांना स्वताहुन विक्री केल्यामुळे त्यांनी दावा दाखल केला नाही. आता मला खरेदीखत नि. क्र. १३० व १३१ दाखविले त्यावरील सही माझ्या वडीलांची नाही. हे म्हणेणे खरे नाही की, खरेदीखतान्वये गयाबाई काळे वाद मिळकतीची मालक झाली असल्याने खरेदीखताबाबत घोषणा मागन्याचा मला अधिकार नाही. हे म्हणेणे खरे आहे की, गयाबाई काळे हिने वाद मिळकत प्रतिवादी क्र. ६ यांना विक्री केली. प्रतिवादी क्र. ६ यांनी वाद मिळकत प्रतिवादी क्र. ७ यांना विक्री केल्याचे मला माहिती नाही. साक्षीदार सांगते की, प्रतिवादी क्र. ७ यांचे नाव ७/१२ उता-यावर लागल्याने त्यांना पक्षकार केले. दावा दाखल करतांना प्रतिवादी क्र. ७ यांच्या नावे झालेल्या खरेदीखताची प्रत विधिज्ञांना दिली होती. प्रतिवादी क्र. ७ यांच्या नावे झालेल्या खरेदीखताबाबतचा मजकुर दाव्यामध्ये व माझ्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये

आहे. हे म्हणेणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ६ यांनी प्रतिवादी क्र. ७ यांना



वाद मिळकत विक्री केली हे मला माहित नसल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणेणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ७ हे तडजोड करतील या उदेशाने खोटा दावा व शपथपत्र दाखल केले.

०६. माझया पुराव्याचे शपथपत्रातील अधोरेखांकित भाग ' अ ' अता मला वाचुन दाखवीला, तो खरा व बरोबर आहे. हे म्हणेणे खरे नाही की, वाद मिळकत माझया वडीलांची स्वकष्टार्जीत मिळकत असल्याने आमची संमती घेण्याचा प्रश्न नव्हता.

प्रश्न : आज रोजी प्रतिवादी क्र. ७ चा ताबा वाद मिळकतीवर आहे असे तुम्ही शपथपत्र तयार करतांना वकीलांना सांगितले होते का?

उत्तर : वाद मिळकतीवर प्रतिवादी क्र. ७ चा ताबा नाही.

०७. हे म्हणेणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील मजकुर कि 'आज रोजी प्रतिवादी क्र. ७ चा ताबा वाद मिळकतीवर आहे' हा मजकुर खोटा आहे.

०८. प्रतिवादी क्र. ८ व ९ यांच्या विरुध्द दावा दाखल करण्यापुर्वी दि. प्र. संहिता कलम ८० प्रमाणे नोटीस दिली नव्हती. तसेच नोटीस माफ करण्यासाठी परवानगीचा अर्ज दिला नव्हता. हे म्हणेणे खरे नाही की, सरकारी अधिकारी यांनी वाद मिळकत अधिग्रहित करु नये या उदेशाने

खोटा दावा दाखल केला.



०९. आम्ही ख्रिश्चन समाजाचे आहोत. हे म्हणेणे खरे नाही की, ख्रिश्चन धर्माप्रमाणे वाद मिळकतीत हिस्सा मागण्याचा आम्हाला अधिकार नाही. मी व वादी क्र. २ व ३ हे प्रतिवादी क्र. ७ यांना कधीही भेटलो नाही. हे म्हणेणे खरे नाही की, दावा दाखल करण्याकरीता खोटे व काल्पनीक कारण नमुद केले आहे. हे म्हणेणे खरे नाही की, वाद मिळकत वडीलानी विक्री केली तेव्हापासुन त्याबाबत आम्हाला माहिती होती. हे म्हणेणे खरे नाही की, जाणीवपुर्वक योग्य मुद्रांक शुल्क भरलेला नाही. हे म्हणेणे खरे नाही की, अर्धवट माहितीच्या आधारे दावा दाखल केला.

१०. प्रतिवादी क्र. ६ यांनी वाद मिळकत वर्ग २ वरुन वर्ग १ मध्ये रुपांतरीत केली त्या आदेशा विरुध्द अपील केले नाही किंवा या दाव्यात मागणी केली नाही. हे म्हणेणे खरे नाही की, वाद मिळकत वर्ग २ वरुन वर्ग १ मध्ये रुपांतरीत झाल्याची माहिती सन २०१८ पुर्वीच आम्हाला होती. हे म्हणेणे खरे नाही की, जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी यांना पक्षकार केले नसल्याने दावा चालु शकत नाही. हे म्हणेणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी घरगुती कारणांसाठी व व्यक्तीक करणांसाठी गयाबाई काळे यांना वाद मिळकत विक्री केली होती. हे म्हणेणे खरे नाही की, वडीलांची देखभाल करण्यासाठी कोणी नसल्याने त्यांनी स्वतच्या खर्चासाठी मिळकत विक्री केली. हे म्हणेणे खरे नाही की, मुदत बाहय दावा दाखल केला आहे. हे म्हणेणे खरे नाही की, दुस-या व्यक्तीच्या सह्या माझ्या वडीलांच्या सह्या

आहेत असे भासुन हस्ताक्षर तज्ञांकडे पाठविल्या. हे म्हणेणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ७ यांनी सर्व कागदपत्रे पाहुन वाद मिळकत खरेदी केली आहे

-१५-

व ते प्रामाणीक खरेदीदार आहेत. हे म्हणेणे खरे नाही की, दाव्यामध्ये योग्य मागणी केली नसल्याने दावा चालु शकत नाही. हे म्हणेणे खरे नाही की, खोटया माहितीच्या आधारे खोटा दावा व शपथपत्र दाखल केले. हे म्हणेणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Sd/-

(सी.म.पाडोळीकर)

दिनांकः ०२.०७.२०२५      २ रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),

जालना.